




४ | रविवार, २३ मार्च २०२५ Smart कोल्हापूर पुण्यनगरी

## पक्षी सुरक्षेसाठी उभारले २५ चिमणी थांबे

### तळसंदे डीवायपी शैक्षणिक संकुलाचा उपक्रम

**नवे पारगाव : प्रतिनिधी**

तळसंदे, ता. हातकणंगले येथील डॉ. डी. वाय. पाटील शैक्षणिक संकुलातील सर्व संस्थांच्या वतीने जागतिक चिमणी दिवसानिमित्त विविध ठिकाणी पाण्याचे कुंड, चिमण्यांसाठी पाण्याची भांडी आणि धान्याची व्यवस्था करण्यात आली. पक्ष्यांसाठी सुरक्षित निवासस्थान म्हणून २५ चिमणी थांबे उभारले.

डी. वाय. पाटील कृषी संकुलाचे संचालक व कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांच्या संकल्पनेतून व प्रा. संदीप पाटील, डॉ. वाय. व्ही. शेटे, इंजि. एस. बी. माळी यांच्या नियोजनातून हा उपक्रम झाला. हेड फार्म ऑपरेशन्स इंजि. ए. बी. गाताडे, सिक्युरिटी हेड देवेंद्र भोसले यांचे योगदान लाभले. अध्यक्षस्थानी डी. वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. प्रथापन होते. कुलसचिव डॉ. जे. ए. खोत, कृषी अभियांत्रिकीचे उपप्राचार्य इंजि. पी. डी. ऊके, कृषी डिप्लोमाचे प्राचार्य प्रा. पी. एस. पाटील, कृषी विज्ञान केंद्राचे राजवर्धन सावंत-भोसले, प्रा. रेडेकर आदी सहभागी झाले. सूत्रसंचालन डॉ. योगेश शेटे यांनी केले. आभार प्रा. संदीप पाटील यांनी मानले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील, उपाध्यक्ष सतेज पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता यांचे प्रोत्साहन लाभले.


GPS Map Camera
Google
Talsande, Maharashtra, India
V7g6+mmx, Chavare, Talsande, Maharashtra 416112, India
Lat 16.876732° Long 74.26138°
20/03/2025 02:22 PM GMT +05:30